# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय, कार्यालय मुंबई.

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१
Email- jtdirrom@gmail.com Website – http:/jdteromumbai.com


कार्यालयीन आदेश

क्र.४/विकामुं/तंशि/पार्श्वनाथ/स्थलांतर/२०१३/ 837
दिनांक 27/2/13

प्रति,
प्राचार्य,
सर्व संबंधीत संस्था
(सोबतच्या यादी प्रमाणे)

विषय :- पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ,कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे या संस्थेंतील विद्यार्थ्यांना अन्य संस्थेत स्थलांतरीत करणेबाबत ( प्रथम/ द्वितीय / तृतीय/चतुर्थ वर्ष उर्वरित विद्यार्थी )

संदर्भ :- १ . संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र
क्र. २/एनजीसी /२०१२/२०९२ दिनांक १९/डिसेंबर/२०१२
२. महाराष्ट्र शासन , उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे
पत्र क्रमांक टीईएम/२०१२/प्र.क्र.८७/तांशि-४ दिनांक २८/डिसेंबर/२०१२
३. संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र
क्र. २/एनजीसी /२०१२/२१३६ दिनांक ३१/डिसेंबर/२०१२
४. या कार्यालयाचे आदेश क्रमांक ४/विकामुं/तंशि/पार्श्वनाथ/स्थलांतर/२०१२/५५
दिनांक ०३/जानेवारी/२०१३
१. या कार्यालयाचे आदेश क्रमांक ४/विकामुं/तंशि/पार्श्वनाथ/स्थलांतर/२०१२/७४
दिनांक ०५/जानेवारी/२०१३

पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ,कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे या संस्थेंतील विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठांतर्गत मान्यता प्राप्त विनाअनुदानीत अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थेत स्थलांतरीत करण्यासाठी संचालनालयाने संदर्भिय पत्रान्वये निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने (पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ,कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे या संस्थेमधील सर्व वर्ष (अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ) त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार व गुणवत्तेनुसार एक विशेष बाब म्हणून संस्था स्थलांतराने प्रवेश देण्याचे या कार्यालयामार्फत संदर्भिय क्रमांक ४ व ५ च्या आदेशान्वये निर्देश देण्यात आले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी मुदतीत विकल्प सादर केले नाहीत किंवा ज्या विद्यार्थ्यांचा निकाल उपलब्ध झाला नाही अशा विद्यार्थ्यांचे नांव स्थलांतरीत केलेल्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले नाहीत. आता संस्थाबदलीसाठी ज्या विद्यार्थ्यांनी विनंती उशिरा अर्ज सादर केलेले आहेत. विद्यार्थ्यांचे (जोडलेल्या यादीमधील) त्यांनी दिलेल्या विकल्प विचारात घेऊन एक विशेष बाब म्हणून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या संस्थेत खालील अटि व शर्तीनुसार स्थलांतराने प्रवेश देण्याचे निर्देश देण्यात येत आहे .

१ शैक्षणिक वर्ष २०१२-१३ चे उर्वरित शैक्षणिक कामकाज जसे सत्र कार्य पुर्ण करुन घेणे, परीक्षा अर्ज स्विकारणे इत्यादि बाबी स्थलांतरीत संस्थेमार्फत पुर्ण करण्यात यावे .पुढील शैक्षणिक सत्रात अधिकचे वर्ग झाल्यास संबंधीत संस्थेने विद्यापीठाशी संपर्क साधून तसे अधिकच्या वर्गाचे आयोजन करावे.

२ सद्यस्थितीत प्रथम सत्र पुर्णत्वाच्या मार्गावर असल्याने त्याप्रमाणात त्यांची शैक्षणिक शुल्क इत्यादि वजाती करुन उर्वरित शुल्क विद्यार्थ्यांना पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे या संस्थेने परत करावी .

३ स्थलांतरीत केलेल्या संस्थेचे लागू असलेले शैक्षणिक शुल्क वर नमुद केलेल्या प्रमाणात शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून नियमानुसार विद्यार्थ्यांना स्थलांतरीत संस्थेत भरणे आवश्यक राहील .तसेच त्यांना शैक्षणिक सवलती मिळत असल्यास यापुढेही सुरु राहतील .(मागास वर्गीय विद्यार्थी, टी.एफ.डब्ल्यु.एस. अंतर्गत )

४. अनुतीर्ण विद्यार्थ्यांचे स्थलांतर विद्यापीठाच्या नियमांच्या अधिन राहून करण्यात येत आहे. आपल्या संस्थेमध्ये स्थलांतरीत केलेल्या विद्यार्थ्यांपैकी जे अनुत्तीर्ण (ATKT नसलेल्या/ड्रापआऊट)आहेत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज हे आपल्या संस्थेमार्फत स्विकारुन विद्यापीठास सादर करावेत . तसेच अशा विद्यार्थ्यांना ते ज्या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाच्या नियमानुसार पुढील वर्गात पात्र होतील त्या शैक्षणिक वर्षात अशा विद्यार्थ्यांना आपल्या संस्थेत प्रवेश निश्चित करावा. तसेच विद्यार्थ्यांचे मुळ कागदपत्रे आपल्या स्तरावर तपासून घेण्यात यावेत.

५. विद्यार्थ्यांचे ओळखपत्र , विद्यापीठाचा एनरोलमेंट क्रमांक ,सत्र परीक्षेच्या गुणपत्रिका , इत्यादि तपासून विद्यापीठाच्या पात्रतेनुसार सबंधीत वर्षात स्थलांतरीत करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश स्थलांतरीत केलेल्या संस्थेने निश्चित करण्यात यावे .

६. जे विद्यार्थी पुर्विच्या संस्थेत प्रात्यक्षिक विषयात अनुत्तीर्ण आहेत अशा विद्यार्थ्यांचे पुर्विच्या संस्थेत जे सत्र कार्य पुर्ण केले आहे , त्या विषयातील सत्र कार्याचा दस्ताऐवज प्राप्त करुन जतन करावा व प्रात्यक्षिक परिक्षेच्या वेळेस आवश्यकते नुसार परिक्षा घेण्यासाठी परिक्षकांना सादर करावा.

( जी बी धनोकार )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत :- १. संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य , मुंबई यांना संदर्भिय पत्रास अनुसरुन माहितीस्तव सादर

२. कुलसचिव , मुंबई विद्यापीठ , मुंबई यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी सादर

३. मा. परिक्षा नियंत्रक ,मुंबई विद्यापीठ , महात्मा फुले भवन, विद्यानगरी, कलीना, सांताक्रुझ पुर्व मुंबई यांना माहितीस्तव सादर

४. प्राचार्य, पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ,कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे यांना कळविण्यात येते की, त्यांनी विद्यार्थ्यांना तात्काळ आवश्यक ती गुणपत्रीका व कागदपत्रे द्यावीत, विद्यापीठासबंधीत कागदपत्रे /विद्यार्थ्यांनी यापुर्वि केलेले सत्र कार्य अहवाल निकालाची प्रत इत्यादि संपुर्ण तपशिलासहीत सबंधीत संस्थांना देण्यात यावीत व आवश्यक ती कार्यवाही करावी . तसेच चालू शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रथम /द्वितीय /तृतीय तसेच अंतिम वर्षास (चतुर्थ वर्ष) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र पुर्णत्वाच्या मार्गावर असल्याने त्याप्रमात त्यांची शैक्षणिक शुल्क इत्यादि वजाती करुन उर्वरित शुल्क विद्यार्थ्यांना परत करावे

५ . संबंधीत विद्यार्थी ( सहसंचालकांच्या www.jdteromumbai.com संकेतस्थळावर उपलब्ध )

D/Parshwanath /Parshwananath

**List of students Proposed for institute transfer from PARSHWANATH ENGG. COLLEGE, Thane to other unaided institutes in Mumbai region**

**( For Students late applied for allotment of institute)**

**Year :- First Year**

| Sr. No. | Name | Course | Allotted or Not | The institute in which transferred | Remarks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Nikhil Kishore Shimpi | Computer | Not Allotted | EN3210 - K.C. College of Engg., Thane | Dropper |

**Year :- Second Year**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | Rahul Ramesh Reddy | Computer | Not Allotted | EN3174 - Ramrao Adik Inst. of Tech., Nerul, Navi Mumbai - 706 | 2nd Year Dropper (Comp) |

**Year :- Third Year**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | Parag Suresh Narkar | Instrument | Not Allotted | EN3146 - A.C.Patil, College of Engg., | 3rd Year Dropper (Instrument) |

**Year :- Fourth Year**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | Jeevan U. Khumbhar | Electronics & Tele. Comm. | Not Allotted | EN3204 - St. Fransis Inst. of Tech., Borivali | 4th Year Dropper allotted only as a Exam Centre |
| 5 | Raviprakash Jha | Electronics & Tele. Comm. | Not Allotted | 3194 - Vidyavardhini College of Engg., Vasai | 4th Year Dropper allotted only as a Exam Centre |

Joint Director,
Technical Education, Mumbai Region,
Mumbai